# आमचा पाळीव प्राणी
(मुलांचा रंगमंच)

या नाटुकलीत आहेत तीन मुले. आई बाबांनी त्यांना एक पाळीव प्राणी निवडायला सांगितले आहे. मुलांच्या निवडीने आई बाबांना जरा आश्चर्यच वाटते...



पात्र परिचय:
निवेदक, बाबा, आई, राजू, मिनी, नीतू

निवेदक: मुलांना कधीपासून एक पाळीव प्राणी हवा आहे. कधीही विचारले तरी आई बाबांचे आपले एकच उत्तर...

राजू: आपण एक मनी माऊ आणायची का?
आई: नाही. तुझ्या बहिणीला मनीच्या केसांचा त्रास होतो.
मिनी: मग आपण मासे आणायचे का?
बाबा: नाही. माशांचं भांडं साफ कोण करणार?
नीतू: आपल्या अंगणात मी एक साप पाहिलाय. त्याला पाळायचं का?
आई: मुळीच नाही!

निवेदक: एक दिवस आई आणि बाबा चांगल्या मूड मध्ये होते. त्यांनी तीनही मुलांना बोलावून बसायला सांगितले.

आई: बाबा आणि मी बोललो. आम्हाला वाटतंय की तुम्ही आता मोठे झाला आहात. जबाबदार झाला आहात. तुम्हाला आता...
बाबा: ...एक पाळीव प्राणी आणता येईल. तुम्हाला पाहिजे तो प्राणी निवडा. पण त्याची जबाबदारी मात्र तुम्ही घेतली पाहिजे.
आई: तर मग आता तुम्ही सगळे मिळून ठरवा तुम्हाला काय पाहिजे ते.

निवेदक: मुले मोठ्या आनंदाने आपल्या खोलीत निघून जातात. साधारण दहा मिनिटांनी मुले पुन्हा बाहेर येतात.

राजू: आम्ही सगळ्यांनी विचार केला...

मिनी: आम्हाला पाहिजे आहे...

नीतू: एक अस्वल!

आई: अस्वल? म्हणजे... टेडी बेअर?

राजू: नाही, नाही! एक खरं खुरं अस्वल! बघा ना, अस्वल कोणाकडेच नसते. म्हणजे आमचा प्राणी अगदी वेगळा असेल नाही?

मिनी: त्यांना खायला देणं सुद्धा सोपं आहे. जांभळे आणि मध दिला की बस्स!

नीतू: आणि ते थंडीत झोपतात. म्हणजे आपल्याला सहलींना जायला सोपं!

राजू: शिवाय, आपल्या घरी जर अस्वल असेल, तर चोरांची भीतीच नाही!

मिनी: मग, तुम्हाला काय वाटतंय?

नीतू: घ्यायचं ना आपण अस्वल?

निवेदक: आई बाबांनी एकमेकांकडे पाहिले. मुलांच्या निवडीचे त्यांना चांगलेच आश्चर्य वाटले होते. पण आई बाबांच्या उत्तराने मुलांना आणखीच आश्चर्य वाटले.

आई: हो, आणुयात आपण अस्वल.

बाबा: आईला आणि मला वाटतंय की ही छानच कल्पना आहे.

आई: आपण जर अस्वल घेतलं, तर तुम्ही मुलं त्याला खायला प्यायला देणार, नाही का? किती बरं खाईल अस्वल?

बाबा: हं... मला वाटतंय की दररोज २० पौंड जांभळे आणि ५-६ तरी मासे खाईल, नाही?

आई: आणि इतकं समान काही मला दुकानातून आणता येणार नाही. मुलांनाच दररोज चालत दुकानात जाऊन आणायला लागेल.

बाबा: थंडीत, बर्फात, एक मैल चालायला लागेल त्यांना.

राजू: एक मैल चालायला लागेल?

मिनी: दररोज जायला लागेल?

नीतू: थंडीत सुद्धा जायला लागेल?

आई: शिवाय, इतक्या सामानाचा खर्चही बराच होईल, नाही?

बाबा: हो ना. आठवड्याला ५०० रुपये तरी लागतीलच. मुलांना त्यांच्या पैशातूनच आणायला लागेल.

राजू: आमचे पैसे?

मिनी: आठवड्याला ५०० रुपये?
नीतू: पण आम्हाला तर तुम्ही फक्त १० रुपये देता.
आई: खरच की, आम्ही याचा तर विचारच नाही केला.
बाबा: ठीक आहे. तुम्ही आणखी काही कामे करून जास्त पैसे मिळवू शकता.
राजू: पण बाबा...
आई: हो ना, कपडे धुणं, स्वयंपाक करणं...
मिनी: पण आई...
बाबा: अंगण साफ करणं, बागेतली कामं करणं...
मुलं: थांबा, थांबा...



निवेदक: मुलांना आता काही सहन होत नव्हतं...

राजू: आम्हाला अस्वल नकोच.
मिनी: आमचा दुसरा प्राणीच छान आहे.
नीतू: हो... आम्हाला आता पाहिजे...
आई: काय पाहिजे? हत्ती का घोडा?
बाबा: वाघ का सिंह?
सगळी मुलं: नाही!
राजू: आम्हाला पाहिजे एक कुत्र्याचं पिल्लू.
मिनी: एक गोड पिल्लू.
नीतू: जे आमच्या बरोबर पळापळी खेळेल.
आई: ही निवड बाकी छान आहे!
बाबा: पण तुमच्या पिल्लाचं नाव काय ठेवणार?
सगळी मुलं: भालू!



~ त्रिवेणी मराठी शाळा
एला केनन (अनुवाद: सुजित उपाध्ये)

१. मुलांना अस्वल का हवे होते? तीन कारणे सांगा.

२. मुलांना अस्वल नकोसे का वाटले? तीन कारणे सांगा.

३. तुम्हाला एखादा वेगळाच प्राणी पाळावासा वाटतो का? का?